## महाराष्ट्रातील शहरी स्थानिक संस्थांसाठी

# कोविड-१९ च्या अनुषंगाने
# प्रतिसाद व सज्जता, जोखीम आणि संसर्गाचे प्रतिबंध व नियंत्रण
## तसेच
# परिसर स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन

---

## याविषयी

## दूरस्थ प्रशिक्षण कार्यक्रम

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

Maharashtra Pollution Control Board
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

unicef | for every child

All India Institute of Local Self-Government

Centre for Sustainable Governance

RCUES Mumbai

**कोविड-१९ च्या अनुषंगाने**
**प्रतिसाद व सज्जता, जोखीम आणि संसर्गाचे प्रतिबंध व नियंत्रण**
**तसेच**
**परिसर स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन**

**याविषयी दूरस्थ प्रशिक्षण कार्यक्रम**

# १. परिचय

# प्रशिक्षणाचा उद्देश

**प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना खालील बाबी अवगत करून देणे:**

- कोविड -१९ बाबत उपलब्ध अद्ययावत ज्ञान व आव्हानासंदर्भात व्यावहारिक निराकरण देणे
- पर्यावरणीय स्वच्छता, स्वच्छता (Hygiene), कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य या संदर्भातील जोखीम आणि समुदायातील आव्हाने / गुंतागुंत लक्षात आणून देणे
- कचरा व्यवस्थापन आणि निर्जंतुकीकरण प्रक्रियेबाबत खबरदारी आणि प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता निर्माण करणे
- झोपडपट्ट्या, दाट लोकवस्तीचे क्षेत्र आणि कंटेनमेंट झोनमधील पर्यावरणीय स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनात गुंतलेल्या फ्रंट लाइन कामगार आणि सेवा प्रदात्यांची आव्हाने समजून घेणे
- नियामक, नैतिक आणि अनिवार्य अहवाल व आवश्यकता समजून घेणे
- फ्रंट लाइन कामगार आणि सेवा प्रदात्यांसाठी वैयक्तिक संरक्षक उपकरणे समजून घेणे
- उपलब्ध असलेल्या चांगल्या पद्धती, तंत्रज्ञानाविषयी तसेच “DO’s and DON’Ts” (काय करावे आणि करू नये) याबाबत जागरूकता निर्माण करणे

# प्रशिक्षण रूपरेषा

| सत्र क्र. | सत्र विषय |
|---|---|
| १ | परिचय |
| २ | कोविड-१९ बद्दल सार्वजनिक आरोग्यासाठी शास्त्रीय माहिती |
| ३ | वॉश (WASH) – खबरदारी आणि प्रतिबंधात्मक उपाय |
| ४ | वॉश (WASH) – चांगली उदाहरणे |
| ५ | जैविक कचरा व्यवस्थापन |
| ६ | कोविड -१९ संदर्भातील अनिवार्य नियम, जीआर आणि मार्गदर्शक तत्त्वे तसेच कार्यालयीन अधिकृत संदर्भ / वेबसाइट |
| ७ | प्रशिक्षणाच्या पुढील अंमलबजावणीसाठी / टप्प्यासाठी कृती योजना |
| ८ | प्रशिक्षणानंतरचे मूल्यांकन |
| ९ | प्रश्नोत्तरे आणि चर्चा |

**कोविड-१९ च्या अनुषंगाने**
**प्रतिसाद व सज्जता, जोखीम आणि संसर्गाचे प्रतिबंध व नियंत्रण**
**तसेच**
**परिसर स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन**

**याविषयी दूरस्थ प्रशिक्षण कार्यक्रम**

# २. कोविड-१९ बद्दल सार्वजनिक आरोग्यासाठी शास्त्रीय माहिती

## २.१. जागतिक परिस्थिती

# कोविड-१९ काय आहे?

**कोविड-१९ हा २०१९ मध्ये सापडलेल्या कोरोना विषाणूमुळे होणारा आजार आहे.**





- तो सार्स-कोवि-२ (Severe Acute Respiratory Syndrome Coronavirus 2) नावाच्या कोरोना व्हायरसमुळे होतो
- सामान्यतः या रोगाची लक्षणे फ्लू सदृश आढळतात
- हा अत्यंत संक्रामक रोग आहे



कोविड-१९ ची सामान्य लक्षणे कोणती?



खोकला, ताप व श्वासोच्छ्वास करताना त्रास होणे ही कोविड-१९ ची लक्षणे आहेत.



Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf

# जागतिक स्थिती

**सर्वप्रथम चीनच्या वुहान प्रांतात, मोठ्या प्रमाणात नोंदविलेला कोविड -१९, जगभरात वेगाने पसरला आहे**

- १५ मे २०२० पर्यन्त जगात ४३,४७,९३५ लोकांना याची लागण झाली असून २,९७,२४१ लोकांचा मृत्यू झालेला आहे[1]
- भारतात ८५,९४० लोकांना लागण झाली असून २७५२ लोकांचे मृत्यू १६ मे २०२० पर्यन्त नोंदवले गेले आहेत[2]




- महाराष्ट्रात २९,१०० लोकांना लागण झाली असून १,०६८ लोकांचा मृत्यू झाला आहे[2]
- मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात १६,७३८ लोकांना लागण झाली असून ६२१ लोकांचा मृत्यू १४ मे २०२० पर्यन्त नोंदवला गेला आहे[3]

*1: Source: WHO: https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019*
*2: Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/#*
*3: Source: PHD, GoM: https://arogya.maharashtra.gov.in/1175/Novel--Corona-Virus*

# २.२. रोगाबद्दल शास्त्रीय माहिती

# कोरोना विषाणू – प्रसार

- **संक्रमित थेंब**

  **>5µm, प्रवास < 1मिटर**

- **थेंबाचा फवारा**
  - **<5µm, प्रवास>1मिटर**
- **संपर्क**
  - **हात, पृष्ठभाग**

**शरीराबाहेर विषाणू जिवंत राहण्याचा काळ:**

- १-२ दिवस छिद्र नसलेला पृष्ठभाग
- ८-१२ तास सछिद्र पृष्ठभाग
- सध्या तरी याबाबत अजून पूर्ण माहिती उपलब्ध नाही

**उष्मायन कालावधी:**

सद्य स्थितीत SARS-CoV-2 या विषाणूचा प्रत्यक्ष शरीरात उष्मायनाचा कालावधी २ ते १४ दिवसांचा आहे




Figure 1. Transmission routes: droplet, airborne, direct contact, and indirect contact. (Indirect contact: routes involving a combination of hand and surface.) Definitions of 'droplet' and 'droplet nuclei' are from Atkinson *et al.*[5]



*Source: Presentation on COVID-19 by Dr Vivek R Pardeshi, Surveillance Medical Officer, WHO India*

# रोगाची तीव्रता आणि प्रसार वेग

## रोग शास्त्र – आजाराची तीव्रता (n=72,314)




Source: China CDC Weekly Vol2 (8)

## रोग प्रसाराचा आकृतीबंध




## भौमितीक प्रसार / प्रगती



Source: Report of WHO China Joint Mission, February 2020

# रोगप्रसाराचे मार्ग




*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# २.३. प्रतिबंध आणि नियंत्रण –अलगीकरण आणि कंटेनमेंट झोन

# संपर्काचे प्रकार

## अधिक धोका

१. **रुग्णाच्या शरीरातील स्त्रावांना स्पर्श करणे** (श्वसनमार्गातील स्त्राव, रक्त, वांती, लाळ, लघवी, विष्ठा)

२. **रुग्णाच्या थेट शारीरिक संपर्कात** येणे, **हस्तांदोलन** करणे, **मिठी मारणे किंवा शुश्रूषा करणे**

३. रुग्णाच्या चादरी, कपडे वा भांड्यांना **स्पर्श करणे वा धुणे**

४. रुग्णाबरोबर **एकाच घरात राहणे**

५. **बाधित व्यक्तीच्या जवळ** असणे (१ मीटरपेक्षा कमी अंतर)

६. वाहतुकीच्या साधनामध्ये **६ तासांहून अधिक काळ** आजाराची लक्षणे असलेली व्यक्तीच्या, जी नंतर **COVID-19 ने बाधित** असल्याचे निदान होते, **त्याच्याजवळ (१ मीटरपेक्षा कमी अंतर) असलेला प्रवासी**

## कमी धोका

१. **एका ठिकाणी सान्निध्यात** असणे (शाळेत एकाच वर्गात/एकाच खोलीत काम करणे/तत्सम आणि कोविड-१९ ने बाधित वा संशयित नसलेल्या व्यक्तीच्या संपर्कात येणे).

२. **एकाच वातावरणात** प्रवास करणे (बस/ट्रेन/विमान/वाहतकीचे कोणतेही साधन) परंतु **संसर्गाचा धोका नसणे**.

संपर्क

अलगीकरण

कंटेनमेंट झोन

रेड (हॉटस्पॉट्स) ग्रीन आणि ऑरेंज झोन्स

*Source: Presentation on COVID-19 by Dr Vivek R Pardeshi, Surveillance Medical Officer, WHO India*

# अलगीकरण – समुदाय आणि घर

## अलगीकरण काय आहे?

१. **आजारी नसलेल्या**, परंतु जे **संसर्ग झालेल्या व्यक्तींच्या संपर्कात आले** आहेत अशा व्यक्तींना **अलग करणे** आणि त्यांच्या **हालचाली प्रतिबंधित करणे**

२. मोठ्या सार्वजनिक संमेलनास/कार्यक्रमास गेलेल्या व्यक्तींचे गट

३. लोकांना सहसा त्यांच्या **घरात अलग ठेवतात** परंतु ते **समुदाय आधारित सुविधांमध्ये** देखील अलग राहू शकतात

४. कठोर अंमलबजावणीसह **प्रतिबंध करण्यासाठी** स्थानिक किंवा समुदायाच्या **परिसरामध्ये** आणि त्या ठिकाणी जाणाऱ्या **रस्त्यांच्या सीमा बंद** करणे

## अलगीकरण का?

1. अलगीकरणामुळे कोविड-१९ च्या रोग्यापासुन समुदायामध्ये रोगाचा प्रसार कमी/प्रतिबंधित होतो

## अलगीकरणामधील खबरदारी

**१. संपर्कात** आलेल्या **व्यक्तींचे निरीक्षण**

1. **कोविड -१९ च्या संभाव्य रुग्णाच्या** संपर्कात आलेल्यां इतर व्यक्तींचे **ताबडतोब अलगीकरण**

**१४**

कोविड-१९ साठी अलगीकरणाचा कालावधी संपर्कात आल्यापासुन १४ दिवसांचा आहे





*Source: Inputs by Dr Sanjay Pattiwar, Former Health Officer, NMMC*

# घरच्या घरी विलगीकरण : संभाव्य बाधित व्यक्तीचे सुरक्षित वास्तव्य

**कोविड-१९च्या संभाव्य बाधित व्यक्तीच्या हालचालींवर प्रतिबंध**

**१. अंतर राखा**

- तुमच्या घरातील हवेशीर असलेल्या विशिष्ट खोलीत आणि कुटुंबातील इतर लोकांनापासून दूर राहा. मर्यादित हालचाल ठेवा.
- उपलब्ध असल्यास स्वतंत्र स्वच्छतागृह वापरा

**२. घरी पाहुण्यांना निमंत्रित करणे टाळा**

- जर तुम्हाला संसर्ग झाला असेल तर त्याची लागण इतरांना होण्याची शक्यता असते

**३. आरोग्य सेवेचा उपयोग करा आणि सूचित करा**

- जर तुम्हाला सर्दी झाली असेल वा ताप आला असेल वा श्वासोच्छ्वास करताना त्रास होत असेल आणि संसर्ग झाल्याची शंका येत असेल तर मास्क लावा आणि नजिकच्या आरोग्य संस्थेला/आशा/एएनएमना तात्काळ सूचित करा

**४. सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळा**

- कामावर, शाळेत किंवा बाजार, चित्रपटगृह यासारख्या सार्वजनिक ठिकाणी जाऊ नका
- सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा वापर टाळा

**५. मास्क लावा**

- लोकांमध्ये वावरताना तसेच डॉक्टरांच्या दवाखान्यात जाताना चेहऱ्यावर योग्यरीत्या मास्क लावा

*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# कंटेनमेंट झोनची ओळख

आरोग्य मंत्रालयाच्या सूचनेनुसार, कंटेनमेंट झोन मध्ये/म्हणजे **विशिष्ट भौगोलिक क्षेत्र ज्या ठिकाणी कोरोना विषाणूची लागण झालेल्या अनेक व्यक्ती आढळतात** व्हायरसचा पुढील प्रसार रोखण्यासाठी अशा भागात हालचालींवर कठोर बंधने घातली जातात

- **आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शक सुचंनानुसार** कंटेनमेंट झोनची विभागणी रेड (हॉट स्पॉट्स) आणि ऑरेंज झोन्स मध्ये राज्य/ केंद्र शासित प्रदेश आणि जिल्हा प्रशासन करू शकते. **मुंबई महापालिकेने देखील मार्गदर्शिका जारी केल्या आहेत**
- कंटेनमेंट झोनची सीमा पुढील बाबी विचारात घेऊन **जिल्हा प्रशासनाद्वारे** परिभाषित केली जाईल: प्रकरणे आणि संपर्कांचे मॅपिंग; प्रकरणे आणि संपर्कांचे भौगोलिक फैलाव; सीमा परिमाणित केलेले क्षेत्र; आणि अंमलबजावणी
- कंटेनमेंट झोनची हद्द शहरी भागाच्या बाबतीत निवासी कॉलनी, मोहल्ला, नगरपालिका प्रभाग, महानगरपालिका विभाग, पोलिस स्टेशन क्षेत्र, शहरे इत्यादी असेल
- **प्रभाग स्तराच्या सूक्ष्म नियोजनासाठी (मायक्रोप्लानिंग), कंटेनमेंट झोन नियोजनाशी जोडण्याची आवश्यकता आहे**




*Example of Containment Zone Demarcation*

*Source: Presentation on COVID-19 by Dr Vivek R Pardeshi, Surveillance Medical Officer, WHO India*

# रेड (हॉटस्पॉट्स), ग्रीन आणि ऑरेंज झोनची ओळख

**ग्रीन झोन**

आजपर्यंत कोविड-१९ संबंधी एकही रुग्ण न आढळलेले जिल्हे किंवा गेल्या २१ दिवसांत कोविड-१९ संबंधित एकही नवीन रुग्ण न आढळलेले जिल्हे

**रेड झोन्स किंवा हॉट स्पॉट जिल्हे**

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनानुसार, जिल्ह्यातील लागण झालेली एकूण रुग्ण संख्या, पुष्टी झालेल्या रुग्णांचा वाढीचा दुप्पट वेग, तपासणी आणि निगराणी यंत्रणा अभिप्राय यावरून ठरवण्यात येतो

**ऑरेंज झोन्स**

जे जिल्हे रेड झोन किंवा ग्रीन झोन मध्ये येत नाहीत असे जिल्हे ऑरेंज झोन मध्ये येतात

*Source: MoHA,GoI: https://www.mha.gov.in/sites/default/files/MHA%20Order%20Dt.%201.5.2020%20to%20extend%20Lockdown%20period%20for%202%20weeks%20w.e.f.%204.5.2020%20with%20new%20guidelines.pdf*

# २.४. शारीरिक अंतर, श्वसन संस्थेची स्वच्छता, हात धुण्याच्या सवयी

# प्रतिबंध: शारीरिक अंतर राखणे

शारीरिक अंतर राखणे: आजार पसरू नये म्हणून आपापसांत हेतूपुरस्सर शारीरिक अंतर राखणे.
लोकांनी एकमेकांमध्ये **किमान १ मीटर अंतर** राखले तर कोविड-१९ ची बाधा होण्याची शक्यता दुरावते.

## करावे

- बाहेर जाण्याची अजिबात आवश्यकता नसेल तर घरीच राहा
- तुम्ही आणि दुसरी व्यक्ती यांच्यामध्ये किमान १ (एक) मीटरचे अंतर राखा




## करू नये

- लोक एकत्र येतील असे समारंभ करू नका (यामध्ये तीन-चार मित्रांनी नाक्यावर उभे राहणे वा संध्याकाळी चावडीवर गप्पा मारणे याचादेखील समावेश आहे)
- बाजार, दुकाने, जत्रा, मेजवान्या यासारख्या गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका
- सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करू नका



*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# प्रतिबंध: श्वसनसंस्थेची स्वच्छता

**श्वसनसंस्थेची स्वच्छता म्हणजे खोकणे किंवा शिंकणे यासारख्या श्वसनसंस्थेशी संबंधित असलेल्या सवयींद्वारे जंतूंचा प्रसार होऊ नये म्हणून करण्यात आलेल्या विविध उपाययोजना**

## करावे

- खोकताना वा शिंकताना तुमचे **तोंड रुमालाने वा टिश्यू पेपरने झाका**
- **वापरलेला टिश्यू पेपर** झाकण असलेल्या कचऱ्याच्या डब्यात **तात्काळ टाकून द्या**
- जर तुमच्याकडे टिश्यू वा रुमाल नसेल तर **शिंकताना दंड दुमडून तुमचे तोंड झाका**
- जर खोकताना वा शिंकताना **तोंड हातांनी झाकले असले तर हात ताबडतोब धुवा**.

## करू नये

- खोकताना वा शिंकताना साडीचा पदर किंवा ओढणी किंवा फडके यासारख्या गोष्टींचा वापर **तोंड झाकण्यासाठी करू नका**.
- **उघड्यावर थुंकू नका**. थुंकण्यासाठी नेहमी पिकदाणी वा वॉश बेसिनचा वापर करा.

*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# मास्कचा वापर



पुरेशा प्रमाणात संरक्षण प्रदान करण्यासाठी केवळ मास्क (मुखवटा) अपुरा आहे आणि तितकेच इतर संबंधित उपाय देखील स्वीकारले पाहिजेत – **हातांची स्वच्छता**



वापरात असताना, मास्कला स्पर्श करणे टाळा



**योग्य तंत्राचा वापर करून मास्क (मुखवटा) काढा** (उदा. समोरच्या भागाला स्पर्श करु नका. लेसच्या मागील भागास धरून काढा)



चुकीच्या पद्धतीने मास्क वापरण्यामुळे संसर्ग होण्याचा धोका वाढतो, त्याची उपयोगिता कमी होऊ शकते



तोंड आणि नाक झाकण्यासाठी काळजीपूर्वक मास्क (मुखवटा) बांधा जेणे करून चेहरा आणि तोंड यांच्यामधे कमीत कमी अंतर राहील



एकल-वापर (single-use masks) मुखवट्याचा **पुनर्वापर करू नका**

**प्रत्येक वापरानंतर** एकल-वापर मुखवटे काढून टाका आणि ते काढल्यानंतर **लगेच विल्हेवाट लावा**

*Source: Presentation on COVID-19 by Dr Vivek R Pardeshi, Surveillance Medical Officer, WHO India*
*Image Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# हातांची स्वच्छता

## करावे

- ४० सेकंद साबण आणि पाण्याने **तुमचे हात सतत धुवा**, विशेषतः सार्वजनिक ठिकाणी जाऊन आल्यावर किंवा नाक शिंकरल्यावर, खोकलल्यावर किंवा शिंकल्यावर
- **जर साबण आणि पाणी उपलब्ध नसेल तर हातासाठीचा सॅनिटायझर (किमान ७०% अल्कोहोल असलेला) वापरावा**. हाताच्या प्रत्येक भागावर लावा आणि दोन्ही तळवे कोरडे होईपर्यंत एकमेकांवर घासा



## करू नये

- **न धुतलेल्या हातांनी** तुमच्या डोळ्यांना, नाकाला व तोंडाला **स्पर्श करू नका**.
- दरवाज्याच्या मुठी व दारावरील घंटी, लिफ्टची बटणे, जिन्याचे कठडे,
- आधारासाठी असलेले दांडे, खुर्च्यांची पाठ, एटीएमचे स्क्रीन, मोबाईल, बस/ट्रेनमधील दांडे **यासारख्या पृष्ठभागांना स्पर्श करू नका**










*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांनी घ्यावयाची खबरदारी

**घरी गेल्यावर खालील बाबींची काळजी घ्या:**





१ आपल्यासाठी दरवाजा खुला ठेवण्यास सांगा किंवा दरवाजा उघडल्यानंतर स्वच्छ/निर्जंतुक करा




२ शूज बाहेर सोडा आणि आपले हात व सामान स्वच्छ करा



3 तुमचे कपडे आणि मास्क धुवायला टाका



४ आंघोळ करा

*Source: Inputs by Dr Sanjay Pattiwar, Former Health Officer, NMMC*
*Image Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# २.५. कोविड-१९ च्या प्रकरणांचे वर्गीकरण व व्यवस्थापन

# कोविड समर्पित सुविधा केंद्रांचे प्रकार

## तीन प्रकारच्या कोविड समर्पित सुविधा केंद्र

**कोविड केअर सेंटर (CCC) | समर्पित कोविड आरोग्य केंद्र (DCHC) | समर्पित कोविड हॉस्पिटल (DCH)**

१ **कोविड केअर सेंटर**मध्ये लाक्षणिक रुग्ण दाखल

२ **तपासणी करून** संभाव्य रुग्ण कक्षात ठेवले

४ **जर बाधीत** असेल तर **बाधित रुग्ण कक्षात** हलवणे

३ **जर बाधीत नसेल**: **विहित प्रोटोकॉल नुसार निर्धारित औषधे आणि प्रतिबंधात्मक आरोग्य उपायांचे** अनुसरण करण्याच्या सूचनेसह लक्षणात्मक उपचारानंतर जाऊ देणे

५ जर रुग्ण मध्यम लक्षणे असलेला असल्यास **समर्पित कोविड आरोग्य केंद्रात पाठवावे**

६ जर **तीव्र लक्षणे** आढळली तर **समर्पित कोविड हॉस्पिटल** मध्ये पाठवावे

*Source: Presentation on COVID-19 by Dr Vivek R Pardeshi, Surveillance Medical Officer, WHO India*

# २.६.मानहानी व अफवा देखरेख

# मानहानीची कारणे?

**कोविड-१९ संबंधी मानहानी करण्याची पातळी खाली दिलेल्या तीन मुख्य घटकांवर आधारलेली असते:**



- **कोविड-१९ हा नवा रोग आहे** ज्यावर अजूनही संशोधन चालू आहे.
- जेव्हा एखादी गोष्ट **अज्ञात** असते तेव्हा त्याबद्दल लोकांच्या मनात **चिंता** असते ज्याचे **रुपांतर भितीमध्ये** होते.
- **अफवा आणि खोट्या बातम्यांमुळे चुकीची माहिती पसरते आणि भिती वाढत जाते**



# मानहानीचे परिणाम काय होतात?



लोक त्यांच्या अडचणी लपवून ठेवतात



लोक आरोग्य सेवा आणि मदत घेण्यापासून दूर राहतात



आरोग्यदायक सवयी स्वीकारण्यासाठी निरुत्साही असतात आणि काही वेळा त्या टाळण्याकडे लोकांचा कल असतो

*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# फ्रंटलाईन कर्मचारी काय करू शकतात?



**स्थानिक पातळीवरील आणि फ्रंट लाईन कर्मचारी यांना खालील सूचना द्याव्यात:**

- लोकांमध्ये जनजागृती निर्माण करा आणि कोरोना हा **साधा संसर्ग असून ८०% व्यक्तींना सौम्य लागण झालेली असते** हे लोकांना व्यवस्थित समजावून सांगा.
- **कोविड-१९ कुणालाही होऊ शकतो**. लोकांशी बोला, त्यांच्या काय भावना आहेत ते ऐकून घ्या.
- घरी खेळता येणारे खेळ, वाचन, बागकाम, घराची साफसफाई यासारख्या **ताण दूर करणाऱ्या गोष्टींमध्ये मन गुंतवण्याचा सल्ला लोकांना द्या**.
- लोकांना टीव्हीवरील **निराशाजनक माहिती तसेच चुकीच्या बातम्यांपासून लांब राहण्यास सांगा**.
- **समाजातील प्रभावी व्यक्तींची मदत घ्या**, त्यांना कोविड-१९ बद्दल योग्य माहिती द्या. त्यांना तुम्हाला हव्या असलेल्या ठराविक मदतीची कल्पना द्या. लोकांना सद्यपरिस्थितीतील ताण हाताळता यावा यासाठी व्हॉट्सअॅप गटांना आशावादी आणि सकारात्मक बातम्या प्रसृत करण्यास मदत करा.
- सार्वजनिक स्तरावर “कोविड-१९ च्या केसेस” किंवा “रुग्ण” असे शब्द न वापरता कोविड-१९ चा **संसर्ग झालेल्या व्यक्ती** असे म्हणा. त्याचप्रमाणे, “संशयास्पद रुग्ण” असे न म्हणता कोविड-१९ च्या **संभाव्य व्यक्ती** असे म्हणा.
- **बहुतांश लोक कोविड-१९ आजारातून बरे होतात** हे अधोरेखित करा, तसेच कोविड-१९ आजारातून कोण बरे झाले? त्यांच्या कुटुंबियांना कुणी मदत केली? यासारख्या स्थानिक लोकांबद्दलच्या बातम्या मुद्दाम विस्तृतपणे सांगा.
- तरुणांची मंडळे आणि इतर सामुदायिक संघटना यांच्या माध्यमातून **ज्येष्ठ नागरिकांना सेवा-सुविधा उपलब्ध करा**.
- ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलं यांच्यासह **अधिक जोखीम असलेल्या गटांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न** करा.

*Source: MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/pdf/2COVID19PPT_25MarchPPTWithAnimation.pdf*

# २.७. सेवा प्रदात्यांचे मानसिक आरोग्य जपणे

# सेवा प्रदात्यांचे मानसिक आरोग्य

**फ्रंटलाइन कामगारांसाठी मानसशास्त्रीय आधार**

- सदय परिस्थितीत ताण येणं ही अगदी सामान्य गोष्ट आहे. आपण आपले कार्य करू शकत नाही किंवा आपण कमकुवत आहात असा त्याचा अर्थ नाही
- **सध्या आपले मानसिक आरोग्य आणि मानसिक कल्याण व्यवस्थापित करणे हे आपल्या शारीरिक आरोग्याएवढेच महत्त्वाचे आहे**
- पुरेशी विश्रांती घेणे गरजेचे आहे, जसे शिफ्ट दरम्यान किंवा कामाच्या मधल्या सुट्टीत तसेच पुरेसे आणि सकस अन्न खाणे, शारिरीक क्रियाकलापांमध्ये व्यस्त असणे आणि कुटुंब आणि मित्रांच्या संपर्कात रहाणे यासारख्या गोष्टी ताण हलका करण्यासाठी करू शकता
- **तंबाखू, मद्यपान** किंवा **इतर तत्सम औषधांचा वापर टाळा**
- काही हेल्थकेअर कर्मचारी दुर्दैवाने त्यांच्या कुटुंबाकडून किंवा समाजाकडून मानहानी किंवा भीतीमुळे टाळले जाण्याचा अनुभव घेतील. अशा वेळी **डिजिटल माध्यमाने प्रियजनांच्या संपर्कात रहा**
- आपल्या सहकाऱ्याची मदत घ्या - तुमच्या सहकाऱ्याना तुमच्यासारखे अनुभव येऊ शकतात

**8046110007**

आरोग्य व परिवार कल्याण मंत्रालयतर्फे टोल फ्री मानसिक स्वास्थ्य सहायता नंबर



मानसिक ताण व्यवस्थापणासाठी प्रशिक्षण सत्र आरोग्य व परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकारच्या वेब साईट वर उपलब्ध आहे



**1800-102-4040**

**संवाद**

महाराष्ट्र शासनाचा सामान्य जनतेसाठी टोल फ्री मानसिक स्वास्थ्य सहायता नंबर

*Source: WHO: https://www.who.int/docs/default-source/coronaviruse/mental-health-considerations.pdf*

# २.८. कोविड -१९ प्रतिबंध आणि नियंत्रण यासाठी कार्यरत संस्था

# कोविड -१९ प्रतिबंध आणि नियंत्रण यासाठी कार्यरत महत्वाच्या संस्था

**जागतिक**

- जागतिक आरोग्य संस्था - World Health Organisation (WHO)
- युनिसेफ - UNICEF

**राष्ट्रीय**

- आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय
- गृह मंत्रालय
- राष्ट्रीय नागरी व्यवहार संस्था
- जलशक्ती मंत्रालय
- भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR)
- राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
- वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद संस्था (CSIR institutions)

**स्थानिक**

- सार्वजनिक आरोग्य विभाग
- मदत आणि पुनर्वसन
- गृह विभाग
- राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
- ग्रामीण विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
- राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ
- स्थानिक स्वराज्य संस्था



**कोविड-१९ च्या अनुषंगाने**
**प्रतिसाद व सज्जता, जोखीम आणि संसर्गाचे प्रतिबंध व नियंत्रण**
**तसेच**
**परिसर स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन**

**याविषयी दूरस्थ प्रशिक्षण कार्यक्रम**

# ३. पाणी आणि स्वच्छता – घ्यावयाची काळजी आणि योग्य उपाय योजना

- सार्वजनिक पाणी पुरवठा आणि स्वच्छता सुविधांच्या ठिकाणांची स्वच्छता
- पाणी पुरवठा आणि स्वच्छता सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन

# सार्वजनिक ठिकाणी हात धुण्याच्या सुविधा

**पारंपारिक पद्धतींना पर्यायी अपारंपरिक प्रणाली**

हॅन्डल्स, दरवाजे, तोट्या ई. पृष्ठभाग सामाजिक स्तरावर विषाणू संसर्ग वाढविण्याचे प्रमुख स्रोत आहेत

**नाविन्यपूर्ण पर्याय**

**हातांनी स्पर्श न करता वापरता येणारी पेडल संचलित हात धुण्याची व्यवस्था**

- सार्वजनिकस्तरावर लोकांना वारंवार हात धुण्यासाठी सर्व सार्वजनिक ठिकाणी पेडल संचलित हात धुण्याची व्यवस्था बसवण्याची शिफारस केली जाते
- पेडल संचलित हात धुण्याची व्यवस्था संसर्गजन्य रोग प्रसार नियंत्रित करण्यासाठी आणि पाण्याची बचत करण्यासाठी उपयुक्त ठरते
- या ठिकाणी साबण वापर टाळण्यासाठी पाण्यात क्लोरीन मिसळता येते



*संसर्गजन्य रोग प्रसार नियंत्रित करण्यासाठी पेडल संचलित हात धुण्याची व्यवस्था, जगभरात प्रभावी पर्याय म्हणून स्वीकारली जाते*

*Source: Guidelines for hygiene and sanitation in densely populated areas, during the COVID-19 pandemic- Office of the Principal Scientific Advisor to the Government of India_ April, 2020*

# सार्वजनिक वापर होत असलेल्या ठिकाणी हात धुण्याची सुलभ सुविधा

## पर्याय १

**घराबाहेर पेडल संचलित हात धुण्याची व्यवस्था बसवणे**

- प्रत्येकी ३-४ घरांसाठी एक या प्रमाणात ही व्यवस्था बसवता येईल यासाठी प्रती युनिट साधारण: शंभर रुपये इतका खर्च येतो




सार्वजनिक वापर होत असलेल्या ठिकाणी हात धुण्याची सुलभ सुविधा तयार करण्याची पद्धती

*Source: 1. Guidelines for hygiene and sanitation in densely populated areas, during the COVID-19 pandemic- Office of the Principal Scientific Advisor to the Government of India_ April, 2020*
*2. Illustrations and process from tippytap.org*

# सार्वजनिक वापर होत असलेल्या ठिकाणी हात धुण्याची सुलभ सुविधा

## पर्याय- २

**सार्वजनिक शौचालये आणि इतर ठिकाणी हातांनी स्पर्श न करता वापरता येणारी पेडल संचलित हात धुण्याची व्यवस्था**







**सार्वजनिक वापर होत असलेल्या ठिकाणी हात धुण्याची सुलभ सुविधा तयार करण्याची पद्धती**

*Source: 1. Illustrations and process from tippytap.org*

*2. Guidelines for hygiene and sanitation in densely populated areas, during the COVID-19 pandemic- Office of the Principal Scientific Advisor to the Government of India_ April, 2020*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि जवळील पृष्ठभागाची स्वच्छता

## सार्वजनिक शौचालय







शौचालयाच्या ठिकाणी शारीरिक अंतर पाळल्या जाईल हे पहा. लोकांना गरज नसताना कोणत्याही पृष्ठभागाला स्पर्श करण्यापासून थांबवा. स्पर्श केलेले पृष्ठभाग पाणी आणि साबणाने धूवून घ्या.

**शौचालयाचा वापर करताना अनवाणी जावू नका. चप्पल किंवा बूट वापरा**

स्वच्छता साधनांच्या ठिकाणी गर्दी होवू देवू नका



*Source: Guidelines for Hygiene and Sanitation in Densely Populated Areas, During the COVID-19 Pandemic, Office of the Principal Scientific Adviser to the Government of India, April, 2020*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि जवळील पृष्ठभागाची स्वच्छता

## सार्वजनिक शौचालय









*Source: Indian Institute of Human Settlements, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि जवळील पृष्ठभागाची स्वच्छता

## सार्वजनिक स्तरावरील शौचालय व्यवस्था देखरेख करणाऱ्यासाठी



शौचालयाचे भांडे दिवसातून किमान २-३ वेळा स्वच्छ करा. वापर करणाऱ्यांची संख्या पाहून हे प्रमाण गरजेनुसार वाढवा




शौचालयाचे भांडे स्वच्छ करताना ग्लोव्हज आणि डीटरजन्टचा उपयोग करा. (कमोड शौचालय असल्यास भांड्याच्या झाकणाची मागची आणि पुढची बाजू डीटरजन्टने स्वच्छ करा. भारतीय पद्धतीच्या शौचालयात पाय ठेवायची जागा याच पद्धतीने स्वच्छ करा.

शौचालय भांडे स्वच्छ करताना त्यावरील डाग स्वच्छ होतील हे पहा आणि क्लीनरचा आणि ब्रशचा उपयोग करा. शौचालय स्वच्छ झाल्यावर ब्रश धुवून घ्या. ग्लोव्हज निर्जंतुक करा आणि ठरलेल्या ठिकाणी पुढील उपयोगासाठी ठेवून द्या.



*Source: Indian Institute of Human Settlements, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि त्या जवळील पृष्ठभागाची स्वच्छता

## सार्वजनिक स्तरावरील शौचालय व्यवस्था देखरेख करणाऱ्यासाठी




काम सुरु करण्यापूर्वी ग्लोव्हज घाला. दरवाज्याचे हॅन्डल, नळाच्या तोट्या, शावर, आरसा आणि सोपकेस ओला कपडा आणि निर्जंतुकीकरण द्रावण वापरून स्वच्छ करा. वापरलेला कपडा शेवटी कपडे धुण्याच्या बॅगेत ठेवा.



शौचालयाची जागा स्वच्छता साधनांच्या सहाय्याने स्वच्छ पुसून घ्या. या कामासाठी निर्जंतुकीकरण करणाऱ्या क्लीनरचा उपयोग करा

स्वच्छता काम संपल्यावर ग्लोव्हज आणि स्वच्छता साधने पाणी आणि निर्जंतुकीकरण करणाऱ्या क्लीनरचा उपयोग करून स्वच्छ करा. शेवटी स्वच्छता साधने ठेवण्याच्या जागा आणि संपर्क आलेल्या जागा निर्जंतूक करून घ्या

*Source: Indian Institute of Human Settlements, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि त्या जवळील पृष्ठभागाची स्वच्छता

## सार्वजनिक स्तरावरील शौचालय व्यवस्था देखरेख करणाऱ्यासाठी



कचरा पेटीत बीन बॅग वापरताना त्या गळक्या नसतील याची खात्री करून घ्या. कचरा पेट्यावर देखरेख करा. कचरा पेट्या तीन चतुर्थांश पेक्षा जास्त भरू देवू नका.

कचरा पेटी दररोज रिकामी करा. कचरा भरून घेतलेल्या बीन बॅग व्यवस्थित बंद करून प्रशासनाच्या सूचनेनुसार त्याचे योग्य व्यवस्थापन करा.



काम संपल्यावर ग्लोव्हज काढून निर्जंतुकीकरण द्रावण वापरून स्वच्छ करा. तुमचे हात पाणी आणि साबण वापरून कोपरापर्यंत स्वच्छ धुवा.

*Source: Indian Institute of Human Settlements, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि जवळील पृष्ठभागाची स्वच्छता

## सार्वजनिक स्तरावरील शौचालय व्यवस्था देखरेख करणाऱ्यासाठी




*Source: Indian Institute of Human Settlements, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# स्वच्छता आणि पाणी पुरवठा सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन





- **कोविड १९ सह इतरही संसर्गजन्य रोगाच्या प्रसारा पासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी स्वच्छता आणि पाणी पुरवठा सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन ही खूप मोठी गरज असते.**

- **कोविड १९ सह इतरही संसर्गजन्य रोगाच्या एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे होणाऱ्या प्रसारा पासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी शहरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रात गुणवत्तापूर्ण व नियमित पाणी पुरवठा आणि सिवेज व्यवस्थापन उपयुक्त ठरते.**

- **कोविड १९ विषाणूचे अस्तित्व अनेक बाबींवर अवलंबून आहे. यात पृष्ठभागाचे स्वरूप, तापमान, आर्द्रता प्रमाण आणि विषाणूचे स्वरूप या बाबींचा समावेश होतो.**



*Source: Advisory on Safe Management Of Water Supply And Sanitation Services During Covid-19 Crisis, MoHUA, GoI, April 2020*

# स्वच्छता आणि पाणी पुरवठा सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन

## पाणी पुरवठा

**सध्यस्थितीत उपलब्ध माहिती नुसार कोविड १९ हा विषाणू पिण्याच्या पाणी पुरवठ्यात  आढळून आलेले नाही. या पार्श्वभूमीवर पाणी पुरवठ्याशी संबंधित धोक्याची तीव्रता कमी आहे.**

कोविड १९ विषाणू मैलामिश्रित पाण्यात एक दिवस ते आठवड्यापर्यंत सक्रीय राहू शकतो. (*LANCET.com अभ्यास अहवालानुसार* ११.२ दोन दिवस)

भारतातील बहुतेक शहरात सध्या उपलब्ध पाणी वितरण प्रणाली पाहता मैलावाहक प्रणालीतून पाणी वितरण व्यवस्थेत मैला मिश्रित पाणी येण्याची शक्यता आहे.

**पाणी स्रोत** → **प्रक्रिया केंद्र** → **वितरण** → **पाणी संकलन आणि साठवण**

सुरक्षित उपायांची गरज

Conventional water treatment methods - filtration and disinfection (chlorine, ultraviolet (UV) light, and other oxidants) **should inactivate the COVID-19 virus.**

Residual concentration of **free chlorine of ≥0.5 mg/L after at least 30 minutes of contact time at pH < 8 shall be applied for the centralized disinfection** during the outbreak. (WHO guidelines)

*Source: Advisory on Safe Management Of Water Supply And Sanitation Services During Covid-19 Crisis, MoHUA, GoI, April 2020*

# स्वच्छता आणि पाणी पुरवठा सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन

## पाणी साठवण आणि हाताळणी

१साठवणीसाठी स्वच्छ भांडी वापरा

३. पाणी गाळून घ्या

५. पाणी घेण्यासाठी ओगराले, तोटी किंवा स्वतंत्र भांडे वापरा

७. पाण्यात हात आणि बोटे बुडवू नका



२ वापरापूर्वी पाणी उकळून घ्या

४ पाण्यात तुरटी फिरवा

६. पिण्याचे पाणी उंचावर ठेवा

८ पाण्याचे स्रोत स्वच्छ ठेवा

Source: *COVID-19 Swachhagrahis Training module- UNICEF*

- **सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू नये**
- **वैयक्तिक सुरक्षा साधने हाताळणी आणि वापर**

# शहर  स्वच्छतेतील सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१



हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

२




सुचवल्या प्रमाणे वैयक्तिक सुरक्षा साधने घाला

३



शौचालय वापरकर्त्यामध्ये योग्य अंतर राहण्यासाठी वर्तुळ काढून त्यात उभे राहायला सांगा

४



शौचालय स्वच्छ करताना वैयक्तिक सुरक्षा साधने वापरा

५




शौच केल्यानंतर हात धुण्याच्या रांगेत दोन व्यक्ती मध्ये एक मीटर अंतर ठेवून  हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवायला सांगा

६



शौचालय वापरासाठी पैसे घेताना ग्लोव्हज घाला

७



हात लावलेल्या वस्तू आणि पृष्ठभाग वारंवार निर्जंतूक करा

८



खाद्य पदार्थ खाण्यापूर्वी प्रत्येकवेळी हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

९



ग्लोव्हज आणि मास्कचा वापर संपल्यानंतर पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# मैलागाळ व्यवस्थापनातील सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू  नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१




हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

२




सुचवलेल्या पद्धतीने वैयक्तिक सुरक्षा साधने घाला (साधने वापरायोग्य नसल्यास बदलून घ्या)

३



वाहनात बसण्यापूर्वी आणि स्वच्छता साधनांना हाताळण्या पूर्वी वैयक्तिक सुरक्षा साधने घाला

४




वाहनात पाणी, साबण आणि सॅनीटायझर सोबत ठेवा

५




वाहनात शारीरिक अंतर राखण्यासाठी विरुद्ध कोपऱ्यात बसा

६




नाक, डोळे आणि चेहऱ्याला हात लावणे टाळा. मास्क लावल्यावर त्याला वारंवार हात लावू नका

*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# मैलागाळ व्यवस्थापनातील सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू  नये

## काम सुरु करताना  सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१


लोकांशी बोलताना योग्य अंतर ठेवा

२


मैलागाळ काढायच्या जागेभोवती इतरांचा प्रवेश प्रतिबंधित करा

३

मैलागाळ उपसण्यासाठीचा पाईप हाताळण्यापूर्वी ग्लोव्हज घाला

४

मैलागाळ उपसल्यावर पाईप आणि प्रवेश प्रतिबंधासाठी वापरलेली व्यवस्था स्वच्छ करा

५

मैलागाळ उपसताना खाली सांडला असेल तर त्यावर चुना टाका

६

मानवी विश्ठेशी संपर्क येणारे कुठलेही काम केल्यावर हात साबण आणि पाण्याने स्वच्छ धुवा

७

मैलागाळ उपस्यासाठी वापरलेली साधने आणि वाहन स्वच्छ धुवून घ्या आणि निर्जंतूक करा

*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# कचरा संकलनातील सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१



कमीत कमी वीस सेकंद हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

२



अनावश्यक जागा आणि वस्तूंना हात लावू नका

३



मास्क, ग्लोव्हज, बूट आणि ऍपरन वापरा

४



डोळे, नाक आणि चेहऱ्याला स्पर्श करणे टाळा

५




सॅनीटायझर सोबत ठेवा.

६




कामाच्या ठिकाणी वाहनातून प्रवास करताना सुरक्षित अंतरावर बसा

*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# कचरा संकलनातील सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१



दरवाजा उघडण्यासाठी हॉर्न वाजवा

२



लोकांपासून किमान एक मीटर अंतर राखा

३



लोकांना त्यांचा कचरा थेट संकलन वाहनात किंवा कचरा पेटीत टाकायला सांगा

४



कचरा आणि कचरा पेट्यांना ग्लोव्हज घातल्याशिवाय हात लाऊ नका

५



नगर प्रशासनाने सांगितल्याशिवाय विलगीकरणातील घरामधून कचरा संकलित करू नका

६



लोकांनी वापरलेले मास्क आणि ग्लोव्हज त्यांना स्वतंत्र कचरा संकलन थैलीत टाकायला सांगा

७



ओला कचरा गोळा करण्यासाठी पॅन वापरा

८



आईस्क्रीम काड्या ई. लाळेशी संबंध आलेल्या कचऱ्याचे संकलन काळजीपूर्वक करा

*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# नाली सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१



कमीत कमी वीस सेकंद हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

२




मास्क, ग्लोव्हज, बूट आणि ॲपरन वापरूनच काम करा. मास्क नसल्यास रुमालाच्या दोन तीन घड्या करून तोंड आणि नाक झाकेल असा बांधा

३



फावडे, घमेले, कामाची जागा प्रतिबंधित करण्याची साधने ई. हाताळण्यापुर्वी वैयक्तिक सुरक्षा साधने घालावीत

४



कामातून विश्रांतीच्या वेळी हात धुण्यासाठी पाणी, साबण आणि सॅनीटायझर सोबत ठेवा.

५



पिण्याचे पाणी आणि जेवण स्वत: सोबत घेवून जा

६



सहकारी आणि इतरासोबत कामादरम्यान एक मीटर अंतर ठेवा

७





८

नाली आणि परिसरातील कचरा आणि गाळ स्वच्छता साधने वापरूनच स्वच्छ करा. उघड्या हातांनी कशालाही स्पर्श करू नका

९





नाली आणि परिसर साफ केल्यानंतर ब्लिचिंग वापरून निर्जंतूक करा



*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# मैलागाळ प्रक्रिया सहभागी सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू  नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१



कमीत कमी वीस सेकंद हात पाणी आणि साबणाने स्वच्छ धुवा

२



अनावश्यक जागा आणि वस्तूंना हात लावू नका

३



मास्क, ग्लोव्हज, बूट आणि ऍपरन वापरा

४




डोळे, नाक आणि चेहऱ्याला स्पर्श करणे टाळा

५




कामाच्या ठिकाणी वाहनातून प्रवास करताना सुरक्षित अंतरावर बसा



*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# मैलागाळ प्रक्रिया सहभागी सफाई कर्मचाऱ्यांसाठी – काय करावे आणि काय करू नये

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी पुढील बाबी अवश्य करा

१




आपण आणि आपल्या सहकाऱ्यात चार फुटाचे अंतर राखा. शक्यतो एकत्र बसू नका

२



मैलागाळ स्वीकारताना नमुना घेण्याची गरज असल्यास काळजीपूर्वक घ्या

३



अनावश्यक जागा आणि वस्तूंना हात लावू नका

४



वारंवार स्पर्श होणाऱ्या जागा, पाण्याचे नळ, पायऱ्यांचे कठडे, दरवाज्याचे हॅंडल दर दोन चार तासांनी निर्जंतूक करून घ्या

५



कचरा हाताळला असल्यास नाक, डोळे आणि चेहऱ्याला हाताने स्पर्श करू नका

६




विष्ठा सांडलेली ठिकाणे स्वच्छ आणि निर्जंतूक करून घ्या

७



जेवणापूर्वी आणि नंतर हात साबण आणि पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. मैलागाळाशी संपर्क, रजिस्टर हाताळणी, परिसर स्वच्छता ई. कामानंतर देखील हात साबण आणि पाण्याने स्वच्छ धुवून घ्या



*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# स्वच्छता आणि पाणी पुरवठा सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन

## स्वच्छता सुविधा आणि कचरा व्यवस्थापन केंद्रावर अपेक्षित सुविधा



हातांची नियमित स्वच्छता ठेवण्यासाठी सुविधा



स्टाफच्या वैयक्तिक उपयोगासाठी सॅनीटायझर उपलब्ध



सुविधा, सुरक्षा साधने उपकरणांसाठी नियमित निर्जंतुकीकरण सुविधा



वापरलेल्या वैयक्तिक सुरक्षा साधनांच्या व्यवस्थापनासाठी निधारित पद्धती आणि सुविधा



कर्मचाऱ्यासाठी पुरेशा प्रमाणात आणि सहज उपलब्ध स्वच्छता सुविधा आणि सुरक्षित पद्धतीने विष्ठा व्यवस्थापन



स्टाफसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी आणि नियमित निर्जंतुकीकरण सुविधा



वैयक्तिक स्वच्छतेसाठी पाणी, कपडे धुण्याची आणि स्वच्छ करण्याची सुविधा

*Source: Advisory on Safe Management Of Water Supply And Sanitation Services During Covid-19 Crisis, MoHUA, GoI, April 2020*

# सफाई कर्मचाऱ्यांसाठी कामादरम्यान आणि नंतर – काय करावे आणि काय करू नये

## कामासाठी घर सोडण्यापूर्वी हे करा



१. पूर्ण बाह्यांचे आणि शरीर पूर्ण झाकणारे कपडे वापरा



२. जखमावर वाटरप्रुफ बॅंडेड लावा



३ स्थानिक संस्थेने दिलेले अत्यावश्यक सेवा ओळखपत्र सोबत ठेवा



४. हात धुण्यासाठी पाणी आणि साबण सोबत ठेवा



५. मास्क, ग्लोव्हज, बूट आणि ॲपरन वापरूनच काम करा. मास्क नसल्यास रुमालाच्या दोन तीन घड्या करून तोंड आणि नाक झाकेल असा बांधा



६. कामाच्या ठिकाणी कपड्याचा अतिरिक्त जोड सोबत ठेवा.

## काम संपवल्या नंतर



सुरक्षा साधने काढा



हात आणि चेहरा धुवा



कपडे बदलून वापरलेले कपडे पिशवीत टाका



तोंडाला मास्क लावून घरी जा



घरात कुणालाही भेटण्यापूर्वी वापरलेले कपडे आणि सुरक्षा साधने साबणाने धुवा आणि वळण्यासाठी कोरड्या जागेवर लटकवा



*Source: Urban Management Centre, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

# स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छता सुविधा व्यवस्थापन

## कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी सुविधा आणि संरक्षण

- **बहुतांश शहरी स्थानिक स्वराज्य संस्था-**

- **वैयक्तिक सुरक्षा साधनांच्या खरेदीसाठी १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाचा निधी वापरत आहेत**
- **वैयक्तिक सुरक्षा साधनांची खरेदी स्थानिक ठिकाणी किंवा तत्काळ पुरवठ्यासाठी अल्प मुदत निविदा पद्धतीने करीत आहेत**
- **वैयक्तिक सुरक्षा साधने आणि सॅनिटायझर व्यतिरिक्त जाणीव जागृतीसाठी उपक्रमाचे आयोजन करीत आहेत**



वाई, महाराष्ट्र





कळमेश्वर, महाराष्ट्र

*Source: Compendium of Good Practices for Small and Medium Towns – Focus on sanitation by Center for Water and Sanitation (C-WAS), CRDF, CEPT University April 2020*

# स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छता सुविधा व्यवस्थापन

## कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी सुविधा आणि संरक्षण

मुंबई महापालिके कडून कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचारी वैद्यकीय तपासणी:

१. कोविड १९ संबंधी जाणीव जागृती आणि या काळात करायच्या आणि टाळायच्या करायच्या बाबी
२. रक्तदाब आणि मधुमेह चाचणी
३. थर्मल स्क्रीनिंगच्या माध्यमातून विषाणू बाधेच्या लक्षणांची तपासणी
४. कर्मचाऱ्यांना गरजेनुसार औषधोपचार आणि उपचारासाठी रुग्णालयात पाठवणी
५. आयुषच्या सूचनेनुसार होमियोपॅथी गोळ्या, पूरक जीवनसत्व आणि वैद्यकीय मास्कची उपलब्धता



जाणीव जागृती



रक्तदाब आणि मधुमेह चाचणी



थर्मल स्क्रीनिंग



विनामुल्य होमियोपॅथी गोळ्या



सॅनीटायझर वाटप

# वैयक्तिक स्वच्छता साधने – वापराच्या शास्त्रीय पद्धती

## वैयक्तिक सुरक्षा साधने – कशी घालावीत आणि काढावीत?

१. मास्क घालताना नाक आणि तोंड पूर्ण झाकले जाईल हे तपासून त्याची पट्टी किंवा इल्यास्टिक कानामागे व्यवस्थित बांधा. मास्कची समोरची बाजू दुषित झालेली असते त्यामुळे मास्क काढताना समोरच्या बाजूला हात लागणार नाही याची काळजी घ्या



२. ग्लोव्हज वापरा. ग्लोव्हजची बाहेरची बाजू दुषित झालेली असते म्हणून ग्लोव्हज काढताना ग्लोव असणाऱ्या हातानी दुसऱ्या हातातील ग्लोव्ह काढावा. दुसऱ्या हातातील ग्लोव्ह काढताना अशीच काळजी घ्या



३. पाय सुरक्षित राहण्यासाठी बूट घाला. बूट काढताना हातात ग्लोव्हज ठेवा



*Source: Indian Institute of Human Settlements, Practitioners resources by NIUA, 2020, SCBP Portal - Response to COVID-19*

- ## निर्जंतुकीकरण

  स्वच्छता आणि पाणी पुरवठा सेवांचे सुरक्षित व्यवस्थापन

# निर्जंतुकीकरण द्रावण तयार करण्याची डब्लूएचओ द्वारे सुचवलेली पद्धती – मार्गदर्शिका




हात स्वच्छ करण्यासाठी निर्जंतुकीकरण द्रावण तयार करण्याची डब्लूएचओ द्वारे सुचवलेली पद्धती सांगणारी ही मार्गदर्शिका आहे. याचे दोन भाग आहेत.

**भाग एक**
फार्मसीच्या ठिकाणी द्रावण तयार करण्याची प्रत्यक्ष पद्धती या भागात सांगितली आहे.

**भाग दोन**
निर्जंतुकीकरण द्रावण तयार करण्यासंबंधी सुरक्षा विषयक बाबी, लागणाऱ्या घटकांची किंमत आणि वितरण इत्यादी संबंधी माहिती दिली आहे.

*Source: WHO-recommended Hand rub Formulations, WHO, 2010*

# निर्जंतुकीकरण द्रावण तयार करण्याची डब्लूएचओ द्वारे सुचवलेली पद्धती – मार्गदर्शिका

- **भाग एक – स्थानिक ठिकाणी उत्पादन आणि लागणाऱ्या साहित्यासह प्रक्रिया संबंधी मार्गदर्शन**
- उत्पादन आणि लागणाऱ्या साहित्यासह प्रक्रिया तपशील – दहा लिटर उत्पादनासाठी
- गुणवत्ता सनियंत्रण पद्धती व उपाय
- उत्पादन आणि साठवणूक पद्धती
- **भाग दोन –पूरक तांत्रिक माहिती सुरक्षा आणि किंमत**
- पार्श्वभूमी
- डब्लूएचओने सुचवलेली अल्कोहल आधारित हॅन्ड सॅनीटायझर तयार करण्याची पद्धत यासंबंधी जागतिक आणि स्थानिक अनुभव
- सुरक्षा मानके, किंमत तपशील, वितरण,साठवण ई.
- वापरासंबंधी धोके आणि उपाययोजना सांगणारा तक्ता



*Source: WHO-recommended Hand rub Formulations, WHO, 2010*

# सार्वजनिक स्वच्छता सुविधा आणि त्या जवळील पृष्ठभाग स्वच्छता

## निर्जंतुकीकरण द्रावण

**रस्ते, शौचालये आणि भिंती क्लोरीनयुक्त निर्जंतुकीकरण द्रावणाच्या माध्यमातून निर्जंतुकीकरण – दिवसातून तीन वेळा फरशी पुसणे, झाडून स्वच्छ करणे आणि फवारणी करणे**

**क्लोरीनयुक्त निर्जंतुकीकरण द्रावणाच्या घटक आणि त्यांच्या मात्रेसंबंधी माहिती**

| Available Hypochlorite Solution (Bleach, Phenyl) | Required Chlorine Concentration | To Prepare 1000ml | |
|---|---|---|---|
| | | Chlorine Solution in ml | Add water in ml |
| ५% | १% | २०० | ८०० |
| १०% | १% | १०० | ९०० |

